जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- ३१ मे, २०२३

जळगाव. दि. ३१ (प्रतिनिधी) नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ४ प्रशाळांमध्ये ४ वर्षीय विविध पदवी अभ्यासक्रम येत्या नव्या शैक्षणिक वर्षापासून सुरु होणार आहेत अशी माहिती कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी दिली.

या नवीन अभ्यासक्रमांतर्गत मेजर आणि मायनरसह सामाजिकशास्त्रे प्रशाळे मध्ये बी.ए.(सोशल सायन्स), व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत बी.बी.ए.(मॅनेजमेंट), गणितशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (मॅथेमॅटीक्स) आणि संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) यांचा समावेश आहे. बी.ए. सोशल सायन्सेस मध्ये मेजर साठी अर्थशास्त्र किंवा राज्यशास्त्र आणि मायनरसाठी मॅनेजमेंट किंवा स्टॅटीस्टीक्स, बी.बी.ए. (मॅनेजमेंट) मध्ये मेजर साठी मार्केटींग किंवा एच.आर.एम. किंवा फायनान्स आणि मायनरसाठी डाटा सायन्स किंवा इकॉनॉमिक्स तसेच बी.एस्सी. (मॅथेमॅटीक्स) मध्ये मेजरसाठी अॅक्युरीअल सायन्स किंवा अप्लाईड स्टॅटीस्टीक्स आणि मायनरसाठी इकॉनॉमिक्स किंवा डाटा सायन्स व बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) मध्ये मेजरसाठी डाटा सायन्स किंवा माहिती तंत्रज्ञान आणि मायनरसाठी मॅथेमॅटीक्स किंवा डीजीटल इलेक्ट्रॉनिक्स हे उपलब्ध पर्याय राहतील.

हे सर्व पदवी अभ्यासक्रम एकाधिक प्रवेश व एकाधिक निर्गमन या पर्यायांसह उपलब्ध असतील. पहिल्या वर्षानंतर जर विद्यार्थी बाहेर पडला तर त्याला त्या विषयातील प्रमाणपत्र मिळेल. दोन वर्षानंतर बाहेर पडला तर पदविका प्रमाणपत्र मिळेल. तीन वर्ष पूर्ण करुन बाहेर पडला तर पदवी आणि चार वर्ष पूर्ण केल्यानंतर ऑनर्स पदवी ही मेजर आणि मायनरसह मिळेल. या नव्या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी तर मिळेलच मात्र विविध पर्यायी आणि कौशल्य संवर्धनाचे अभ्यासक्रम शिकता येतील. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने तयार केलेल्या या अभ्यासक्रमांच्या रचनेमुळे बहुविद्याशाखीय दृष्टीकोन, ओपन इलेक्टीव्ह, मूल्यवर्धित अभ्यासक्रम, क्षमतावर्धित अभ्यासक्रम, जीवनकौशल्य अभ्यासक्रम आणि व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रम या सहा तत्वांचे पालन होणार आहे.

नवीन शैक्षणिक वर्षापासून हे अभ्यासक्रम विद्यापीठाच्या प्रशाळेत सुरु होणार असून याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

## बातमी क्र.२

जळगाव. दि. ३१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विविध परीक्षांचे निकाल निर्धारित वेळेच्या आत लागावेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु केले असून कुलगुरु

प्रा.व्ही.एल.माहेश्वरी व प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी स्वतंत्रपणे धुळे व जळगाव जिल्ह्यातील ऑनलाईन उत्तरपत्रिका तपासणी केंद्रांना अकस्मात भेटी दिल्या.

परीक्षा झाल्यानंतर किमान ३० व कमाल ४५ दिवसात निकाल घोषित करणे आवश्यक आहे. यासंदर्भात राज्यपाल तथा कुलपती यांनी काही दिवसांपूर्वी विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल मुदतीच्या आत लावण्याबाबत सूचना दिल्या होत्या. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने याबाबतीत तातडीने काही पावले उचलली. कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी त्याआधी दि.२ मे रोजी प्राध्यापकांना पत्र लिहून परीक्षा मूल्यांकनात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. बुधवार दि.३१ मे रोजी कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांनी धुळे जिल्ह्यातीलक काही उत्तरपत्रिका तपासणी केंद्रांना अचानक भेटी दिल्या. उत्तरपत्रिका तपासणी करणाऱ्या प्राध्यापकांसमवेत चर्चा करुन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. सर्वत्र योग्य प्रतिसाद मिळत असल्याचे या भेटीमध्ये कुलगुरुंना आढळून आले. प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी देखील जळगाव जिल्ह्यातील काही केंद्रांना भेटी दिल्या. सध्या विद्यापीठाने ऑनलाईन उत्तरपत्रिका तपासणीसाठी ६८ केंद्रे कार्यान्वित केली आहेत.

याशिवाय विद्यापीठाने मूल्यांकनात शिक्षकांचा सहभाग वाढावा यासाठी शिक्षकांच्या उन्नत अभिवृध्दी योजनेअंतर्गत पदोन्नतीचा लाभ मिळणेसाठी प्रस्ताव दाखल करतांना पेपर सेटींग किंवा उत्तरपत्रिका मूल्यांकनाच्या कामकाजात सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे. तसेच मूल्यांकनात सहभागी होणाऱ्या शिक्षकांना विद्यापीठाच्या विविध समित्यांवर कामाची संधी प्राधान्याने देण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्व उपायांमुळे निकाल वेळेवर लागणे अपेक्षित आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी